सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/३९२७ दिनांक : 31 JUL 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत मतदार नोंदणी वाढविणेबाबत.**

संदर्भ : १. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१३, पुणे यांचे कार्यालयाचे पत्र क्र.उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/९०/२०२४ दि.२२.०७.२०२४

२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.स्विप २०२४/प्र.क्र.९४४/२४/३३ दि.१२.०७.२०२४

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.०२ अन्वये महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात या वर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. पात्र नव मतदारांची मतदार नोंदणी करून घेणे आणि विधानसभा निवडणूकीआधी राज्याची अद्ययावत मतदार यादी तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून यासाठी या कार्यक्रमाच्या कालावधी दरम्यान विविध उपक्रम राबवले जातील. या दृष्टीने या कार्यक्रमाअंतर्गत दि.२५ जुलै २०२४ (गुरूवार) ते दि.०९ ऑगस्ट २०२४(शुक्रवार) हा कालावधी दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी म्हणून निर्धारित करण्यात आला आहे.

दावे आणि हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत प्रत्येक जिल्हयातील निवडणूक यंत्रणेने मतदारांना मतदार यादीत नाव आहे की नाही ते तपासण्यासाठी, पात्र नागरिकांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी, विद्यमान मतदारांना त्यांचे नावे, पत्ते आणि अन्य तपशील दुरूस्त्या तसेच बदल करण्यासाठी, विशेषतः मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक/ई-मेल आयडी जोडण्यासाठी, मतदार यादीत दिव्यांगत्व चिन्हांकित करण्याचा, योग्य कारणासाठी मतदार ओळखपत्र पुन्हा मिळविण्यासाठी, मतदार ओळखपत्रासोबत आधार क्र. जोडण्यासाठी, मृत्यु/कायमचे स्थलांतर या आणि अशा योग्य कारणांसाठी मतदार यादीतून नाव वगळणे याकरता प्रोत्साहित करणे अपेक्षित आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवर विविधांगी मतदार जागृतीपर उपक्रम राबवणे, मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे अशा सूचना मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत. त्यासाठी संदर्भीय पत्र क्र.०१ मध्ये दिलेल्या १ ते ६ मद्दयांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. (सोबत संदर्भिय पत्र)

त्यानुसार दि.२५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष मतदार नाव नोंदणी उपक्रम आयोजित करण्यात यावे. सदर मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. तसेच उपरोक्तप्रमाणे राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा फोटोंसहीत सविस्तर अहवाल slaopune13@gmail.com या ई-मेलवर सादर करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून या कार्यालयातील श्री. संदीप वाघ, प्रोग्रॅमर हे काम पाहतील.

सोबत- संदर्भिय पत्र.

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

SVEEP

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा


उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १
इमेल आयडी - slaopune१३@gmail.com


---

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/ ७० /२०२४ दिनांक - २२ /०७/२०२४

निवडणूक तात्काळ

प्रति,

१. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

२. सहसंचालक
उच्च शिक्षण, पुणे विभाग

**विषय**:- विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत मतदार नोंदणी वाढविणेबाबत.

संदर्भ:- १. या कार्यालयाकडील पत्र क्र. उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/०६/२४ दि. ११/०७/२०२४

२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. स्विप२०२४/प्र.क्र.९४४/२४/३३, दि. १२ जुलै २०२४

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात या वर्षीच्या दुस-या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. पात्र नव मतदारांची मतदार नोंदणी करून घेणे आणि विधानसभा निवडणुकीआधी राज्याची अद्ययावत मतदार यादी तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून यासाठी या कार्यक्रमाच्या कालावधी दरम्यान विविध उपक्रम राबवले जातील. या दृष्टीने या कार्यक्रमाअंतर्गत दि. २५ जुलै २०२४ (गुरुवार) ते ०९ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) हा कालावधी दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी म्हणून निर्धारित करण्यात आला आहे.

दावे आणि हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत प्रत्येक जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेने मतदारांना मतदार यादीत नाव आहे की नाही हे तपासण्यासाठी, पात्र नागरिकांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी, विद्यमान मतदारांना त्यांचे नावे, पत्ते आणि अन्य तपशील दुरुस्त्या तसेच बदल करण्यासाठी, विशेषतः मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक/ई-मेल आयडी जोडण्यासाठी, मतदार यादीत दिव्यांगत्व चिन्हांकित करण्याचा, योग्य कारणासाठी मतदार ओळखपत्र पुन्हा मिळविण्यासाठी, मतदार ओळखपत्रासोबत आधार क्र. जोडण्यासाठी, मृत्यू/कायमचे स्थलांतर या आणि अशा योग्य कारणांसाठी मतदार यादीतून नाव वगळणे याकरता

प्रोत्साहित करणे अपेक्षित आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवर विविधांगी मतदार जागृतीपर उपक्रम राबवणे, मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे अशा सूचना मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. युवा नव मतदारांची नोंदणी (मतदार नोंदणीसाठीच्या निकषांनुसार पात्र असलेल्या १००% युवा नव मतदारांची नोंदणी करण्याच्या उद्देशासह) विद्यापीठे, महाविद्यालयांशी सहकार्य पूर्ण भागीदारी करावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्यावेळीच मतदार नोंदणीचा अर्ज भरला जावा यासाठी प्रवेश अर्जामध्ये विद्यार्थ्याने मतदार यादीत नावनोंदणी केली आहे किंवा कसे याबाबतचा कॉलम (स्तंभ) समावेश करण्यासाठी पुढकार घ्यावा. ज्या विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी झाली नाही अश्या विद्यार्थ्यांची यादी तयार करण्याची जबाबदारी द्यावी. आणि संबंधित मतदार अधिकाऱ्याकडे याचा पाठपुरावा करून मतदार नोंदणी करून घेण्याची जबाबदारी द्यावी.
२. महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता मंडळ (ELC), राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तसेच नेहरू युवा केंद्र (NYK) यासारख्या संस्थांच्या सहकार्याने महाविद्यालयांमध्ये मतदार नोंदणीसाठी आणि त्याबाबतच्या जागृतीसाठीचे उपक्रम/शिबिरे राबवावीत. त्यांना मतदार नोंदणी आणि सेवांविषयी मार्गदर्शन करून अपेक्षित उद्देशासह नोंदणीची जबाबदारी द्यावी.
३. वेबिणार आणि कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्व पटवून द्यावे. मतदार नोंदणीची पात्रता, प्रक्रिया, मतदार नोंदणीसाठी लागणारे दस्तावेज, मतदारांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सेवा आणि अर्ज यांविषयी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी.
४. विद्यार्थ्यांसाठी voters.eci.gov.in हे संकेतस्थळ तसेच Voter Helpline या मोबाईल ॲपचा वापर करून मतदार नोंदणीसह विविध अर्ज भरण्याची प्रात्याक्षिके घ्यावीत. ही व्यासपीठे कशी वापरावीत, त्यावर लॉगीन कसे करावे, अर्जांची स्थितीगती कशी जाणून घ्यावी, ई मतदार ओळखपत्र कसे डाउनलोड करावे, मतदार यादीत नाव कसे शोधावे, याविषयी मार्गदर्शन करावे. याकरता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरील व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवावेत.
५. मतदार नोंदणीबाबत जागरूकता करण्यासाठी अभिनव स्पर्धा राबवाव्यात. यात मतदार नोंदणीचे संदेश देणाऱ्या रांगोळी, चित्रकला, घोषवाक्य, पथनाट्य स्पर्धांच समावेश असावा. याद्वारे मिळणारे साहित्य मतदार जागृतीसाठी वापरावे. चांगल्या पथनाट्यांचे प्रत्यक्षात लोकांमध्ये सादरीकरण करावे.
६. सर्वाधिक मतदार नोंदणी करणारे विद्यार्थी, विविध अर्ज भरणारे विद्यार्थी अशा प्रोत्साहनपर स्पर्धांचेही आयोजन करण्यात यावे.

त्यानुसार दि. २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष मतदार नावनोंदणी उपक्रम आयोजित करण्यात यावेत. सदर मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. तसेच उपरोक्तप्रमाणे राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा फोटोंसहीत सविस्तर अहवाल या कार्यालयास slaopune13@gmail.com या ई-मेलवर सादर करण्यात यावा.

(डॉ. सुहास दिवसे)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत:-उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचेकडे माहितीसाठी.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक :- स्वीप २०२४/प्र.क्र.९४४/२४/३३,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १२ जुलै, २०२४

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय :-** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत मतदार नोंदणी वाढविण्याबाबत

महोदय / महोदया,

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात या वर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. पात्र नव मतदारांची मतदार नोंदणी करून घेणे आणि विधानसभा निवडणुकीआधी राज्याची अद्ययावत मतदार यादी तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश. यासाठी या कार्यक्रमाच्या कालावधी दरम्यान विविध उपक्रम राबवले जातील. या दृष्टीने या कार्यक्रमाअंतर्गत दि. २५ जुलै २०२४ (गुरूवार) ते ०९ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) हा कालावधी दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी म्हणून निर्धारित करण्यात आला आहे.

२. दावे आणि हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत प्रत्येक जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेने मतदारांना मतदार यादीत त्यांचे नाव आहे की नाही हे तपासण्यासाठी, पात्र नागरिकांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी, विद्यमान मतदारांना त्यांचे नावे, पत्ते, आणि अन्य तपशील दुरुस्त्या तसेच बदल करण्यासाठी, विशेषतः मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक / इमेल आयडी जोडण्यासाठी, मतदार यादीत दिव्यांगत्व चिन्हांकीत करण्याचा, योग्य कारणासाठी मतदार ओळखपत्र पुन्हा मिळवण्यासाठी, मतदार ओळखपत्रासोबत आधार क्र. जोडण्यासाठी, मृत्यू / कायमचे स्थलांतर या आणि अशा योग्य कारणांसाठी मतदार यादीतून नाव वगळणे याकरता प्रोत्साहीत करणे अपेक्षित आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवर विविधांगी मतदार जागृतीपर उपक्रम राबवणे, मतदार नोंदणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

३. या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलवजावणीसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

<u>युवा मतदार नाव नोंदणी</u>

१. युवा नव मतदारांची नोंदणी (मतदार नोंदणीसाठीच्या निकषांनुसार पात्र असलेल्या १००% युवा नव मतदारांची नोंदणी करण्याच्या उद्देशासह) विद्यापीठे, महाविद्यालयांशी सहकार्य पूर्ण भागिदारी करावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्यावेळीच मतदार नोंदणीचा अर्ज भरला जावा यासाठी प्रवेश अर्जामध्ये विद्यार्थ्याने मतदार यादीत नाव नोंदणी केली आहे किंवा कसे याबाबतचा कॉलम (स्तंभ) समावेश करण्यासाठी पुढाकार घ्यावा. ज्या विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी झाली नाही अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करण्याची जबाबदारी द्यावी, आणि संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे याचा पाठपुरावा करुन मतदार नोंदणी करून घेण्याची जबाबदारी द्यावी.

२. महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता मंडळ (ELC), राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तसेच नेहरु युवा केंद्र (NYK) यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने महाविद्यालयांमध्ये मतदार नोंदणीसाठी आणि त्याबाबतच्या जागृतीसाठीचे उपक्रम-शिबीरे राबवावित. त्यांना मतदार नोंदणी आणि सेवांविषयी मार्गदर्शन करून अपेक्षित उद्देशासह नोंदणीची जबाबदारी द्यावी.

३. वेबिनार आणि कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्त्व पटवून द्यावे. मतदार नोंदणीची पात्रता, प्रक्रिया, मतदार नोंदणीसाठी लागणारे दस्तऐवज, मतदारांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सेवा आणि अर्ज यांविषयी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी.
४. विद्यार्थ्यांसाठी voters.eci.gov.in हे संकेतस्थळ तसेच Voter Helpline या मोबाईल ॲपचा वापर करून मतदार नोंदणीसह विविध अर्ज भरण्याची प्रात्यक्षिके घ्यावीत. ही व्यासपीठे कशी वापरावीत, त्यावर लॉगीन कसे करावे, अर्जाची स्थितीगती कशी जाणून घ्यावी, ई मतदार ओळखपत्र कसे डाऊनलोड करावे, मतदार यादीत नाव कसे शोधावे, याविषयी मार्गदर्शन करावे. याकरता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या युट्यूब वाहिनीवरील व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवावेत.
५. मतदार नोंदणीबाबत जागरूकता करण्यासाठी अभिनव स्पर्धा राबवाव्यात. यात मतदार नोंदणीचे संदेश देणाऱ्या रांगोळी, चित्रकला, घोषवाक्य, पथनाट्य स्पर्धांचा समावेश असावा. याद्वारे मिळणारे साहित्य मतदार जागृतीसाठी वापरावे. चांगल्या पथनाट्यांचे प्रत्यक्षात लोकांमध्ये सादरीकरण करावे.
६. सर्वाधिक मतदार नोंदणी करणारे विद्यार्थी, विविध अर्ज भरणारे विद्यार्थी अशा प्रोत्साहनपर स्पर्धांचेही आयोजन केले जाऊ शकते.

<u>मतदार जागृती</u>

१. दावे आणि हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत सुरु असल्याबातची माहिती नागिरकांपर्यंत पोहचवत नागरिकांनी मतदार नोंदणीसह विविध सेवा – सुविधांचे अर्ज भरावेत यासाठी प्रोत्साहन द्यावे
२. होर्डिंग, बॅनर, पोस्टर, जिंगल यांचा प्रभावी वापर करावा. या माध्यमातून मतदार यादीत नाव तपासण्याचे / नोंदणीचे महत्व, आवश्यक दस्तऐवज, मतदार नोंदणी आणि इतर विविध अर्ज भरण्यासाठी उपलब्ध व्यासपीठे, याविषयीची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी.
३. मतदार जागृतीपर संदेश तळागाळापर्यंत पोहचावेत यासाठी स्थानिक पातळीवर सर्व शासकीय (आराटीओ, प्रवासी सेवा आस्थापने, नागरी सेवा आस्थापने) आणि खाजगी आस्थापनांचे सहकार्य घ्यावे. त्यांच्या अखत्यारीतील प्रसिद्धी माध्यमांचा (होर्डिंग, बॅनर, पोस्टर लावण्याच्या जागा, जिंगल वाजवण्यासाठीच्या जागा, वाहने) सहकार्यपूर्ण वापर करून घ्यावा.
४. स्थानिक पातळीवरील सामाजिक संघटनांचे नियमांना अधिन राहून सहकार्य घ्यावे.

<u>विशेष शिबीरे</u>

१. युवा, महिला तसेच सर्व वंचित घटकांमधील पात्र नागरिकांना मतदार नोंदणी करणे सुलभ व्हावे, यासोबतच सर्वसमावेषकतेच्या मुल्यांचे पालन व्हावे यासाठी युवा, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, देहव्यवसाय करणाऱ्या महिला, भटके विमुक्त, तसेच सर्वसाधारण समाज घटकासाठी विशेष शिबीरे आयोजित करावीत. (या शिबीरांच्या तारखा सोबत दिल्या आहेत)
२. संबंधित शिबीरांचे स्थळ ठरवताना, ते ज्यांच्यासाठी आहे तो समाज घटक उपस्थित राहू शकेल अशारितीने शिबीरांच्या स्थळासाठीचे नियोजन करावे.
३. शिबीर यशस्वी होण्यासाठी ज्यांच्यासाठी शिबीर घेणार आहात, अशा समाज घटकाला आवश्यक दस्तऐवज, दस्तऐवजांचे पर्याय यासंबंधीची माहिती आगाऊ मिळेल आणि ते तशा तयारीने येतील याची सुनिश्चिती करावी.
४. ज्या ठिकाणी शिबीर घेणार आहात तिथल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने शिबीर होणार असल्याची माहिती संबंधित समाज घटकांपर्यंत पोहचवण्याची जबाबदारी पार पाडावी, विशेषतः या शिबीरांचे दिवस हे शनिवार आणि रविवार हे सुट्टीचे दिवस असल्याची माहिती पोहचेल याची सुनिश्चिती करावी.
५. शिबीरांमध्ये मतदारांची, मतदार यादीत नाव तपासण्याची सोय उपलब्ध असेल, नवीन मतदारांच्या नोंदणीसाठी तसेच, दिव्यांगत्व चिन्हांकन, मोबाईल क्रमांकासह इतर वैयक्तिक तपशीलांमधील बदल / दुरुस्त्या / अद्ययावतीकरणासाठीचे अर्ज उपलब्ध असतील याची सुनिश्चिती करावी.

६. शिबीराला उपस्थित प्रत्येकाला सेवा देण्याच्या हेतूने पुरेसे मनुष्यबळ उपस्थित असेल याची सुनिश्चिती करावी.
७. शिबीरांच्या नियोजनपूर्ण आखणी आणि यशस्वीतेसाठी महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, देहव्यवसाय करणाऱ्या महिला, भटके विमुक्त इत्यादी घटकांसाठी काम करत असलेल्या संघटनांच्या सहकार्याने - भागिदारीत मतदार नोंदणीसाठी प्रयत्न करावेत. याअंतर्गत नोंदणी पासून वंचित राहिलेल्या नागरिकांचा शोध घ्यावा, दस्तऐवजांबद्दलच्या सर्व पर्यायांची माहिती पोहचवावी, मतदार नोंदणीचे महत्व अधोरेखीत करून मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहीत करावे.
८. आपल्या समाजमाध्यमांवरील खात्यांवरून या कार्यक्रमाचा प्रचार प्रसार करावा, स्थानिक निवडणूक सदिच्छा दूत, स्थानिक इन्फ्लूएन्सर - प्रतिष्ठित - प्रसिद्ध व्यक्तींमार्फत मतदार नोंदणीचे आवाहन करावे. (यासाठीची नमूना संहिता पत्रासोबत जोडली आहे.)
९. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, तसे भारत निवडणूक आयोगाने आपल्या समाजमाध्यमांवर टाकलेल्या पोस्ट शेअर कराव्यात.
१०. आपण राबवलेल्या उपक्रमांची माहिती वेळोवेळी समाजमाध्यमांवर छायाचित्रे आणि व्हिडिओसहीत पोस्ट करावीत.
११. मतदार नोंदणीसाठी आपण केलेले नियोजन, आखलेले उपक्रम याविषयीची माहिती समाजमाध्यमांवरून पोहोचवावी.
१२. सहकार्य करणारी, महाविद्यालये, शासकीय - खाजगी आस्थापने, व्यक्ती आणि संस्थांना .आवश्यक अर्जांच्या प्रति उपलब्ध करून द्याव्यात. त्यांना येणाऱ्या अडचणी अपेक्षित सहकार्य यासाठी सातत्यपूर्ण संवाद राखावा.
१३. या कार्यक्रमाअंतर्गत प्रारुप मतदार यादी प्रकाशित झाल्यानंतर या यादीचे ग्रामस्तरीय पातळीवर ग्रामसभांमधून वाचन होईल याची सुनिश्चिती करणे, आणि त्याआधारे संबंधित गावातील मतदारांची वगळणी, नव्या मतदारांची नोंदणी, तपशीलातील बदल / दुरुस्त्या तसेच स्थलांतरासंदर्भातील अर्जांबाबतची कार्यवाही करावी.

<u>महत्वाच्या सूचना</u>

१. होर्डिंग, बॅनर, पोस्टर, जिंगल साठी लागणारे प्रचार साहित्य आपल्याला गुगल ड्राईव्ह लिंकवर उपलब्ध करून दिली असून, लिंक पत्रासोबत नमूद केली आहे. कृपया या लिंकवर जाऊन साहित्य डाउनलोड करून आपल्या जिल्ह्यात वापरावे.
२. स्थानिक गरजेनुसार आपण आपल्या स्तरावरही प्रचार साहित्याची निर्मिती करावी
३. आपल्या जिल्ह्यात राबविलेल्या सर्व मतदार जागृती उपक्रमांचा तपशीलवार अहवाल देणे बंधनकारक आहे. अपेक्षित अहवालाच्या प्रारुपाचा नमुनाही या पत्रासोबत जोडला आहे. त्यानुसार या कार्यक्रमाचा तपशीलवार अहवाल सादर करावा.
४. आपण जिल्ह्यात राबवलेल्या उपक्रमांची चांगल्या गुणवत्तेची छायाचित्रे, व्हिडिओ काढून गुगल ड्राईव्हवर अपलोड करून त्याची लिंक शेअर करावी.

<u>प्रचार साहित्याची लिंक</u> :- https://drive.google.com/drive/folders/1JiB6LHV-ajCQ4kttRAXtIAhivuWAOuo_?usp=sharing

या कार्यालयाकडून आणखी प्रचार साहित्य तयार करण्यात येत आहे. सदर प्रचार साहित्य तयार झाल्यानंतर उपरोक्त गुगल लिंकमध्ये अपलोड करण्यात येईल. यानुषंगाने सदर गुगल लिंक वेळोवेळी तपासून त्यामध्ये नव्याने केलेल्या प्रचार साहित्यांचाही उपरोक्त प्रमाणे प्रचार - प्रसिद्धी करावी, ही विनंती.

आपला,

(शरद दळवी)
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत :-१. जिल्हा स्वीप नोडल अधिकारी, सर्व,
२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

## College Campaign for Young Voters – ERO Reporting Format at AC Level

| Reporting Format For ACs- 2nd SSR Campaign 2024 | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Name of the college | Category (Govt/ Private/ Affiliated/ Deem University/ Institute of National Importance/ Technical/ Medical/ Management/LAW/Agri/Distance Education / Womens / Minority/ Other) | Total No. of Students | Total No 17+ Students | Total No 18+ Students | No. of 18+ Electors (Already have Voter ID) | No. of Students who have completed 18 year age and not yet registered | No. of forms received during SSR | | No. of Accepted Forms | | No. of Rejected Forms | | Voter Registration percentage of the College during SSR |
| | | | | | | | | Form 6 | Form 8 | Form 6 | Form 8 | Form 6 | Form 8 | |
| 1 | | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | | |

# 2nd SSR 2024 Campaign – District Reporting Format

| Sr No. | District | Target Group | Partnership / Collaboration | Nodal Officer | Campaign Name | Campaign Description | Population of that Target Group in the district (Get Data from Concern Official Dept) | No. form of Received during SSR | | Newspaper Cutout | Photos / Videos |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Drop Down | Drop Down | Name & Contact | | | | Form 6 | Form 8 | | |
| 1 | | General Voter | 1. NGO/CSO | | | | | | | | |
| 2 | | Young Voters | 2.CII/FICCI/ASOCHAM | | | | | | | | |
| 3 | | PWD | 3. Govt Depts eg Aids Control, Education dept, Industry, Labour, Social Justice etc | | | | | | | | |
| 4 | | Transgender | 4. Educational Institute / University | | | | | | | | |
| 5 | | PVTG | 5. ELCs | | | | | | | | |
| 6 | | Nomadic Tribes | 6. Political Party | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **7** | | **FSW** | **7. Media** | | | | | | | | |
| **8** | | **Women** | **8. Trade Associations** | | | | | | | | |
| **9** | | **Homeless** | **9. Doctors Associations** | | | | | | | | |
| **10** | | **Sr Citizen** | **10. Teachers Association** | | | | | | | | |
| **11** | | **Migrants** | **12. Corporates** | | | | | | | | |
| **12** | | **Low Enrolment Area** | **13. Other(Plz Specify)** | | | | | | | | |
| **13** | | **Service Voters** | | | | | | | | | |

## Annexure

### College Campaign for Young Voters – District Reporting Format

| 2nd SSR Campaign 2024 - College Campaign - Reporting Format for Districts | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr No | District Name | Assembly Name | Total No. of Colleges in that Assembly Category wise. | Total No. of 18+ Students | Total No of 18+ Electors | No. of Students who have completed 18 year age and not yet registered | No. of forms received during SSR | | No. of Accepted Forms | | No. of Rejected Forms | | Voter Registration percentage of the College during SSR |
| | | | Category (Govt/ Private/ Affiliated/ Deem University/ Institute of National Importance/ Technical/ Medical/ Management/LAW/Agri/Distance Education / Womens / Minority/ Other) | | | | Form 6 | Form 8 | Form 6 | Form 8 | Form 6 | Form 8 | |
| 1 | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | |

937

वारिसद
१९५

## दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत आयोजित उपक्रम

| उपक्रम | कालावधी |
|---|---|
| प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी | २५ जुलै २०२४ (गुरूवार) |
| दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी | २५ जुलै २०२४ (गुरूवार) ते ०९ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) |
| विशेष शिबिरे | २७ (शनिवार) आणि २८ (रविवार) जुलै २०२४ |
| विद्यार्थी, दिव्यांग, महिला यांसाठी विशेष शिबिरे | १, २, आणि ३ ऑगस्ट २०२४ |
| तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, बेघर, भटक्या आणि विमुक्त जाती जमातीच्या व्यक्ती या लक्षित घटकांसाठी विशेष शिबिरे | ३(शनिवार) आणि ४ (रविवार) ऑगस्ट २०२४ |
| विशेष ग्रामसभा | २ ऑगस्ट २०२४ |
| दावे आणि हरकती निकालात काढण्याचा कालावधी | १९ ऑगस्ट २०२४ (सोमवार) पर्यंत |
| अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी | २० ऑगस्ट २०२४ (मंगळवार) |

**निवडणूक सदिच्छा दूत, तुमचा आवडता कलाकारांसाठी मतदारांना आवाहनाचे स्क्रीप्ट**

सगळ्यांना नमस्कार,
मी ...... ...... ..... (निवडणूक सदिच्छा दूत, तुमचा आवडता कलाकार)
तुम्ही आमच्यावर खूप प्रेम करता, आमचं ऐकता,
त्याच हक्कानं मला आज एक महत्वाची गोष्ट सांगायचीय
बघा आता लवकरच आपल्याकडे विधानसभेच्या निवडणुका होतील.
आणि आपल्या प्रत्येकाला तेव्हा मत द्यायचंय.

पण होतं काय की आपण, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जातो, आणि मग काही जणांना त्यांची नावं यादीत सापडली नाही, किंवा नावच चुकीचं आहे असं दिसलं की मग तक्रारींचा पाढा वाचत राहतो.
हीच परिस्थिती आपल्याला बदलायची आहे.
आणि त्यासाठीची मोठी संधी आपल्यासमोर चालून आलेय
कारण खास मतदारांच्या सोयीसाठी
विधानसभेच्या निवडणुकीआधीचा या वर्षातला दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम सुरू झालाय.
२५ जुलैपासून ९ ऑगस्ट पर्यंत हा कार्यक्रम सुरू असणार आहे.
तेव्हा या काळात सगळ्यात आधी तुम्ही मतदार यादीत तुमचं नाव आहे का तपासून घ्यायचंय,
त्याच बरोबर मतदार यादीतले तुमचे सगळे तपशील बरोबर आहेत की नाही ते पण नीट पाहायचंय
आणि समजा तुमचं यादीत नाव नसेल, तपशीलात काही बदल दुरुस्त्या असतील तर त्यासाठी लगेच अर्ज भरायचाय

इतकंच नाही जर तुम्ही तुमचा पत्ता बदलला असेल तर त्यासाठी पण अर्ज भरा.

आणि हो... नुकतीच १८ वर्षे पूर्ण केलेल्या माझ्या भावांनो, बहिणिंनो, मित्र मैत्रिणिंनो

तुम्ही पण न चुकता मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी अर्ज भरायचा आहे,

तारीख लक्षात आहे ना... २५ जुलैपासून ९ ऑगस्ट पर्यंत

आणि हे सगळं तुम्ही हा व्हिडिओ ज्या मोबाईलवर पाहाताय ना त्याच मोबाईलवरून करू शकता.

फक्त वोटर हेल्पलाईन ॲप वापरून,

आत्ता लगेच डाऊनलोड करा.

आता हे सगळं जबाबदारीनं केलंत, की मग मतदानाच्या दिवशी घोळ होणारच नाही... कसा होईल....

ऐकाल ना माझं..... धन्यवाद

Collector 9205

## २रा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४

**प्रसिद्धीपत्रक**

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. पात्र नवमतदारांची मतदार नोंदणी करून घेणे आणि विधानसभा निवडणुकीआधी राज्याची अद्ययावत मतदार यादी तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश. यासाठी या कार्यक्रमाच्या कालवधीदरम्यान विविध उपक्रम राबवले जातील.

**कार्यक्रमाचा कालावधी:**

हा कार्यक्रम २५ जुलै २०२४ (गुरूवार) पासून सुरु होऊन २० ऑगस्ट २०२४ (मंगळवार) पर्यंत चालेल. या काळात मतदार नोंदणी करण्यासह, मतदार यादीतील नाव, पत्ता, आणि अन्य तपशील पडताळून, त्यात बदल – सुधारणा करण्याची संधी नागरिकांना असणार आहे.

**कार्यक्रमातील मुख्य उपक्रम:**

**१. एकीकृत प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी:**

दि. २५ जुलै २०२४ (गुरूवार) रोजी एकीकृत प्रारूप मतदार यादी प्रकाशित केली जाईल. यामध्ये सर्व मतदारांची अद्ययावत माहिती समाविष्ट असेल. ही मतदार यादी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर यादी भागासहीत उपलब्ध करून दिली जाईल. ही यादी डाऊनलोड करून तसेच www.electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळावरून अथाव Voter Helpline हे मोबाइल ॲपचा वापर करून मतदारांना मतदार यादीत त्यांचे नाव आहे की नाही, तसेच नाव असेल तर त्यासोबतचे वैयक्तिक आणि पत्ता हे तपशील तपासून पाहता येतील. ही यादी पाहण्यासाठी मतदार आपल्या जवळच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला देखील भेट देऊ शकतील.

**२. दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी:**

दि. २५ जुलै २०२४ (गुरूवार) ते ०९ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) या कालावधीत नागरिकांना त्यांचे नावे, पत्ते, आणि अन्य तपशील दुरुस्त्या तसेच बदल करण्यासाठी विशेषतः मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक – इमेल आयडी जोडण्यासाठी, मोबाईल किंवा मतदार

नोंदणीचा, मतदार यादीत दिव्यांगत्व चिन्हांकीत करण्याचा, योग्य कारणासाठी मतदार ओळखपत्र पुन्हा मिळवण्यासाठी, मतदार ओळखपत्रासोबत आधार क्र. जोडण्यासाठी असे विविध अर्ज भरता येईल. यासोबतच, मृत्यू – कायमचे स्थलांतर या आणि अशा योग्य कारणांसाठी मतदार यादीतून नाव वगळ्याचा अर्जही भरता येईल.

यासाठी भारत निवडणूक आयोगाने नागरिकांना पुढीलप्रमाणे अर्ज उपलब्ध करून दिले आहेत.
अर्ज क्र. ६ - नव मतदार नोंदणीसाठी
अर्ज क्र. ८ - मतदार यादीतील वैयक्तिक तपशीलात बदल – दुरुस्त्या - अद्ययावतीकरण, पत्त्यातील बदल – स्थलांतर, दिव्यांगत्वाचे चिन्हांकन, मोबाईल क्र. – इमेल आयडी हे तपशील जोडणे, मतदार ओळखपत्र पुन्हा मिळावे यासाठी विनंती करणे
अर्ज क्र. ७ – योग्य कारणासाठी मतदार यादीतून नाव वगळण्याच्या विनंतीसाठी
अर्ज क्र. ६ब – मतदार ओळखपत्रासोबत आधार क्र. जोडण्यासाठी

हे सर्व अर्ज www.voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline हे मोबाइल ॲप वापरून ऑनलाईन भरता येतील. यासोबतच जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयाला भेट देऊन, तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमादरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष शिबिरांमध्ये ऑफलाईन पद्धतीनेही भरता येतील.

प्रत्येक अर्जासोबत गरजेनुसार आपले छायाचित्र, पत्ता तसेच वयाच्या पराव्याचा दस्तऐवज, वा पुरावा म्हणून आवश्यक असलेल्या इतर दस्तऐवजाची स्व – स्वाक्षरीकृत प्रत जोडणे अनिवार्य असणार आहे.

**३. विशेष शिबिरे:**

या कार्यक्रमाच्या काळात युवा नवमतदार, दिव्यांग, महिला, तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, बेघर, भटक्या आणि विमुक्त जाती जमातीच्या व्यक्ती या लक्षित घटकांसाठी विशेष शिबिरे आयोजित केली जातील. कार्यक्रमाच्या कालावधीतील शनिवार आणि रविवार या दिवशी या शिबिरांचे आयोजन केले जाईल. या शिबिरांच्या माध्यमातून या लक्षित घटकांना मतदार नोंदणीची संधी सुलभरित्या उपलब्ध करून दिली जाईल.

**४. दावे आणि हरकती निकालात काढण्याचा कालावधी:**

कार्यक्रमाच्या कालावधीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर अर्थात दावे आणि हरकतींवर नियमांनुसार कार्यवाही करून ते दि. १९ ऑगस्ट २०२४ (सोमवार) पर्यंत निकाली काढले जातील.

**५. अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी:**

दावे आणि हरकती नियमांनुसार निकाली काढल्यानंतर दि. कार्यवाही २० ऑगस्ट २०२४ (मंगळवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाईल. यात या कार्यक्रमा दरम्यान दावे आणि हरकतीसाठी उपलब्ध करून दिलेल्या कालावधीत आलेल्या अर्जांवरील कार्यवाहीनुसार नव्या तसेच बदल आणि दुरुस्ती केलेल्या मतदारांच्या नावासहीतची अंतिम यादी समाविष्ट असेल.

**मतदार नोंदणीसाठी महत्वाचे:**

भारतीय नागरिक असलेले आणि दि. १ जुलै २०२४ किंवा त्याआधी १८ वर्षे पूर्ण केलेले नागरिक मतदार नोंदणीसाठी पात्र असतील.

**मतदार यादीत नाव तपासण्यासाठी:**

मतदार यादीत आपले नाव तपासण्यासाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत:

- www.ceo.maharashtra.gov.in आणि www.electoralsearch.eci.gov.in ही संकेतस्थळे.
- Voter Helpline हे मोबाइल ॲप.
- मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय.

**मदत क्रमांक:**

नागरिकांना कोणतीही अडचण असल्यास मतदार मदत क्रमांक १९५० किंवा १८००२२१९५० वर संपर्क साधावा.